2/9/2009

तरुण भारत

डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा पुरस्कार जाहीर

नगर वार्ताहर

नागपूर, १ सप्टेंबर

मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार यंदा योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे. पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मारवाडी बांधवांनी विविध क्षेत्रात, देशांतर्गत आणि जगात आपल्या पुरुषार्थाचा ठसा उमटविला आहे. देशातील राष्ट्रीय एकात्मतेसाठी आणि जागतिक बंधुभावासाठी मारवाडी समाजाचा पुरुषार्थ अधिक सकारात्मक करण्याचा मारवाडी फाऊंडेशनचा उद्देश असून, त्यातूनच दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने, राष्ट्रीय पातळीवर त्यांचे विचार उराशी बाळगून काम करणाऱ्याला हा पुरस्कार देण्यात येत असतो. २००९ च्या या पुरस्कारासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांची निवड करण्यात येत असल्याची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी केली आहे. डॉ. नरेंद्र जाधव हे प्रख्यात अर्थतज्ज्ञ असून, त्यांनी रिझर्व्ह बँक, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही आपल्या सेवा दिल्या आहेत. अमेरिकेतून त्यांनी अर्थशास्त्रात पीएच. डी. केली. रिझर्व्ह बँकेत प्रधान सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी ३१ वर्षे काम केले आणि नंतर निवृत्ती पत्करली. ■

देशोन्नती दि 15/2005

देशोन्नती

डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा भारतरत्न पुरस्कार

प्रतिनिधी / १ सप्टेंबर

नागपूर : मारवाडी फाऊंडेशनच्या पाच लाख रुपयांच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारासाठी योजना आयोगाचे सदस्य डॉ.नरेंद्र जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय पातळीवर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार उराशी बाळगून आपल्या सामाजिक कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तीला या पुरस्काराने फाऊंडेशनतर्फे सन्मानित केले जाणार आहे.

यावर्षीच्या पुरस्कारासाठी प्रसिध्द अर्थतज्ज्ञ, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू व ➤पान ४ वर

डॉ. नरेंद्र जाधव

भारत सरकारच्या योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची निवड करण्यात आल्याची माहिती मारवाडी फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी दिली.

राज्यातील शैक्षणिक आरक्षणाच्या संदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांनी राज्य सरकारला अहवाल सादर केला होता. प्रामाणिक म्हणून त्यांची ख्याती आहे. साधारणत: विधानसभा निवडणुकीनंतर हा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे. गतवर्षी हा पुरस्कार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना देण्यात आला होता.

डॉ. नरेंद्र जाधव यांना पुरस्कार

डॉ. नरेंद्र जाधव

नागपूर, ता. १ : नियोजन आयोगाचे सदस्य, सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार जाहीर झाला आहे. नागपुरातील मारवाडी फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराचे स्वरूप पाच लक्ष रुपये आणि सन्मानपत्र असे आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

सकाळ

२१/१

लोकसत्ता

डॉ. नरेंद्र जाधव मारवाडी फाऊंडेशनच्या डॉ. आंबेडकर पुरस्काराचे मानकरी

नागपूर, ५ सप्टेंबर/ प्रतिनिधी

सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

मारवाडी समाजातील व्यक्तींनी देशात आणि जगातही विविध क्षेत्रात स्वांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आणि सामाजिक बंधुभावासाठी आणखी सकारात्मक काम करण्याच्या उद्देशाने मारवाडी फाऊंडेशन काम करीत आहे. यातूनच, डॉ. आंबेडकरांचे विचार उराशी बाळगून आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटवणाऱ्या व्यक्तीचा दरवर्षी पाच लाख रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. २००९ सालच्या पुरस्कारासाठी अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेत ३१ वर्षे नोकरी केल्यानंतर डॉ. जाधव हे प्रधान सल्लागार व मुख्य अर्थतज्ज्ञ या पदावरून स्वेच्छानिवृत्त झाले. ऑगस्ट २००६ ते जून २००९ या काळात ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. गेल्या २७ जुलै रोजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी त्यांची योजना आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक केली.

नरेंद्र जाधव यांना भाई माधवराव बागुल पुरस्कार, न्या. मा.गो. रानडे पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, महात्मा फुले पुरस्कार, भारत ज्योती अॅवार्ड, कृतज्ञता गौरव पुरस्कार, सामाजिक न्याय पुरस्कार, नेताजी सुभाषचंद्र साहित्य गौरव पुरस्कार, विश्व-सेतू अॅवार्ड, महाराष्ट्र रत्न पुरस्कार, सी.डी. देशमुख पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा राष्ट्रीय पुरस्कार, अस्मितादर्श पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, केंद्रीय शिक्षण व संस्कृती मंत्रालयाचा नॅशनल स्कॉलर इन इकॉनॉमिक्स पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. ■

डॉ. जाधव यांना मारवाडी फाउंडेशनचा पुरस्कार

डॉ. नरेंद्र जाधव

नागपूर, ता. १ : नियोजन आयोगाचे सदस्य, सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने देण्यात येणारा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार जाहीर झाला आहे. नागपुरातील मारवाडी फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये आणि सन्मानपत्र असे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा ठसा आपल्या कार्यातून सिद्ध करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

पुण्यनगरी २१/१२/०९

पुण्यनगरी

डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा पुरस्कार जाहीर

नागपूर, दि. ७ (प्रतिनिधी) – मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने पारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि भारत सरकारच्या योजना आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकर यांचे विचार उराशी बाळगून आपल्या अलौकिक कार्याचा ठसा राष्ट्रीय पातळीवर उमटविणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. रोख पाच लाख रुपये, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मारवाडी बांधवांनी विविध क्षेत्रात देश – विदेशात आपला ठसा उमटविला आहे. देशातील विविध धर्माचे संस्थापक, पराक्रमी राजे – महाराजे आणि राष्ट्रपुरुषांनी या देशाच्या एकतेसाठी आणि सामान्य माणसाच्या उत्थानासाठी प्रयत्न केल्याचा इतिहास आहे. यासंदर्भात देशातील राष्ट्रीय एकात्म तेसाठी व जागरूक बंधुभावासाठी मारवाडी समाजाचा पुरुषार्थ अधिक सकारात्मक करण्याचा मारवाडी फाऊंडेशनचा उद्देश आहे.

या हेतूनेच समाजासाठी झपाटून काम करणाऱ्या आणि राष्ट्रीय पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या मान्यवरांना फाऊंडेशनच्या वतीने पुरस्कार देण्यात येतो.

लोकमत

डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा पुरस्कार

नागपूर, दि. १ (प्रतिनिधी) : मारवाडी फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू व केंद्रीय योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार उराशी बाळगून आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तिला दरवर्षी ५ लाख रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Bahujanratan Loknayak

Dated: 05-09-2009

डॉ. नरेंद्र जाधव मारवाडी फाऊंडेशनच्या डॉ. आंबेडकर पुरस्काराचे मानकरी

नागपूर (प्रतिनिधी) – सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मारवाडी समाजातील व्यक्तींनी देशात आणि जगातही विविध क्षेत्रात त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आणि जागतिक बंधुभावासाठी आणखी सकारात्मक काम करण्याच्या उद्देशाने मारवाडी फाऊंडेशन काम करीत आहे. यातूनच, डॉ. आंबेडकरांचे विचार उराशी बाळगून आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटवणाऱ्या व्यक्तीचा दरवर्षी पाव लाख रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. २००९ सालच्या पुरस्कारासाठी अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेत ३१ वर्षे नोकरी केल्यानंतर डॉ. जाधव हे प्रधान सल्लागार व मुख्य अर्थतज्ज्ञ या पदावरून स्वेच्छानिवृत्त झाले. ऑगस्ट २००६ ते जून २००९ या काळात ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. गेल्या २७ जुलै रोजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी त्यांची योजना आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक केली. नरेंद्र जाधव यांना भाई माधवराव बागुल पुरस्कार, न्या. मा.गो. रानडे पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, महात्मा फुले पुरस्कार, भारत ज्योती अॅवार्ड, कृतज्ञता गौरव पुरस्कार, सामाजिक न्याय पुरस्कार, नेताजी सुभाषचंद्र साहित्य गौरव पुरस्कार, विश्व-सेतू अॅवार्ड, महाराष्ट्र रत्न पुरस्कार, सी.डी. देशमुख पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा राष्ट्रीय पुरस्कार, अस्मितादर्श पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, केंद्रीय शिक्षण व संस्कृती मंत्रालयाचा नॅशनल स्कॉलर इन इकॉनॉमिक्स पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र आयोग स्थापणार - डॉ. जाधव

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) -हिंदुस्थानातील उच्च व तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात येत्या अडीच वर्षांत क्रांतिकारी बदल होणार असल्याचे सांगतानाच, यूजीसी, एआयसीटीई, एनसीटीई यांसारख्या १५ संस्था बरखास्त करून 'राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन आयोग' स्थापन करण्यात येणार असल्याचे केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

नियोजन आयोगाचे सदस्य या नात्याने देशातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत डॉ. जाधव यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

ते म्हणाले, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी प्रो. यशपाल आणि राष्ट्रीय ज्ञान आयोगाची समिती नेमण्यात आली होती. या दोन्ही समित्यांनी 'राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन आयोग' स्थापन करण्याची शिफारस केली आहे. हा आयोग स्थापन झाल्यास यूजीसी, एआयसीटीई, एनसीटीई यांसारख्या १५ संस्था बरखास्त केल्या जाणार आहेत.

राष्ट्राध्यक्षा प्रतिभाताई पाटील यांनी वैद्यकीय शिक्षणासाठी स्वतंत्र आयोगाची घोषणा केली आहे. देशातील कृषी विद्यापीठांचा कारभार वेगळा असल्याने या क्षेत्रासाठी स्वतंत्र आयोग स्थापन केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे उच्च शिक्षण, वैद्यकीय आणि कृषीक्षेत्रासाठी तीन वेगवेगळे आयोग अस्तित्वात येणार आहेत.

सर्वशिक्षा अभियानाची प्रगती चांगली असून, घरापासून ३ किलोमीटर अंतराच्या परिसरात शाळा उभारण्याचे लक्ष्य ९८ टक्के साध्य झाले. मात्र, गुणवत्तेची कमतरता असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. अकरावी पंचवार्षिक योजना राबविताना ९ टक्के विकास दराचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते. मात्र, जागतिक मंदीच्या परिणामामुळे हिंदुस्थानचा विकास दर ६.७ टक्क्यांवर स्थिरावला. ऑगस्ट महिन्यापर्यंत देशभरात कमी पाऊस झाल्याने दुष्काळाचे सावट निर्माण झाले असून, विकासदर कमी झाला. सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस झाल्यास विकासदर ६.३ टक्के होईल. पुढच्या वर्षी तो ८ टक्के आणि योजनेच्या शेवटच्या वर्षात तो ९ टक्क्यांवर नेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले.

पुढारी
7/9/1

राज्यातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना काम करण्याची संधी

राष्ट्रीय हिताला बाधा न आणता महाराष्ट्राला झुकते माप देणार : डॉ. जाधव

पुणे : प्रतिनिधी

केंद्रीय नियोजन मंडळाच्या विविध सल्लागार समितीच्या सदस्यपदी राज्यातील विविध तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात आली आहे. अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर समित्यांवर काम करण्याची संधी प्रथमच मराठी व्यक्तींना मिळत आहे. समितीने सुचविलेल्या सूचनांचे पालन करण्यात येणार असून त्या दृष्टीने येत्या केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणार आहे. राज्यातील तज्ज्ञ मंडळींना समितीच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळाल्याने तीन राज्ये व दोन केंद्रशासित प्रदेशांच्या विकासाला हातभार मिळणार आहे.

केंद्रीय नियोजन मंडळाच्या प्राथमिक, उच्च, तंत्र शिक्षण, श्रम, रोजगार, क्रीडा व युवक कल्याण, साम

> यंदा सरासरीपेक्षा पाऊस कमी झाल्याने अन्नधान्याचा तुटवडा जाणवणार आहे. परिणामी, विकासदर ६.३ टक्के असेल. जागतिक पातळीवर अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे ९ टक्के असणारा विकासदर साध्य होणार नाही. सन २०११-१२ मध्ये विकासदर ९ टक्के जाईल. त्यासाठी नवीन स्रोत शोधावे लागतील, असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले.

जिक न्याय या समित्यांच्या माध्यमातून तज्ज्ञांना काम करण्याची संधी मिळेल. नियोजन आयोगाच्या प्रत्येक सदस्यांना विविध राज्यांच्या विकासासाठी कशा प्रकारचे नियोजन करावे यासाठी जबाबदाऱ्या देण्यात येतात. बिहार, तमिळनाडू, गोवा या राज्यांसाठी व दादर, नगर, हवेली व दमण या केंद्रशासित प्रदेशांचीही जबाबदारी डॉ. जाधव यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. संबंधित राज्याच्या नियोजनाची जबाबदारी पार पाडताना सदस्य सल्लागार समिती नेमतात. महाराष्ट्रातून जाऊन नियोजन आयोगाचे सदस्यपद अनेकांनी भूषविले आहे. मात्र, राज्यातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मंडळींना समित्यांवर काम करण्याची संधी मिळत नव्हती. डॉ. जाधव यांनी इतर राज्यांच्या विकासासाठी काम करण्याची संधी तज्ज्ञांना दिल्याने पुन्हा एकदा महाराष्ट्राची शान दिल्लीत उंचावणार आहे. यामुळे आतापर्यंत दिल्ली, बंगाल येथील लोकांचा समित्यांवर असणारा वचक कमी होणार आहे.

शालेय शिक्षण सल्लागार समितीच्या सदस्यपदी माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, भाई वैद्य, डॉ. कुमार सप्तर्षी, गजानन एकबोटे, रमेश जोशी, दिनकर गांगल, हरेष कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आली आहे. तर उच्च शिक्षण सल्लागार समितीच्या सदस्यपदी डॉ. विजय खोले, अरुण अडसूळ,

> उच्च शिक्षणाच्या बाबतीत फार मोठे बदल होणार आहेत. प्रा. यशपाल कमिटी आणि राष्ट्रीय ज्ञान आयोगाने एक अहवाल दिला होता. त्यानुसार देशात उच्च शिक्षण व संशोधन आयोग स्थापन करण्यात येणार आहे. हा आयोग स्थापन केला तर यूजीसीसह इतर १५ संस्था बरखास्त करण्यात येतील, तसेच वैद्यकीय व कृषी क्षेत्रासाठीही आयोग निर्माण होतील.

दिलीप नाचणे, पी. डी. पाटील, सुखदेव थोरात, श्रम सल्लागार समितीच्या सदस्यपदी डॉ. एम. के. पंधे, डॉ. अजिंक्य पाटील, राघवन रसाळ, मुरलीधर चैनी, डॉ. चंद्रहास देशपांडे, जयराज शाळगावकर, सुनिल कदम, अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय सल्लागार समितीच्या सदस्यपदी ए. के. डी. जाधव, अशोक भारती, चंद्रभान प्रसाद, शाम बाबू, हर्षदीप कांबळे, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. शरदश्चंद्र गोखले, हरी नरके, आर. पी. काळे, सुधीर मेश्राम, जी. जी. वानखडे, आदिवासी विकासासाठी प्राचार्य ए. टी. कानवडे, प्रताप गायकवाड, लक्ष्मण माने, क्रीडा व युवक कल्याणकारी डॉ. संभाजी पठारे, डॉ.संजय चाकणे, अजित वाडेकर, नयना निमकर, डॉ. मिलींद भोई यांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत.

समितीच्या सदस्यांच्या बैठका होणार आहेत. त्यानुसार सूचना तयार होतील आणि येत्या अर्थसंकल्पात नेमकी किती तरतूद व्हावी यासाठी शिफारस करणार आहे. सध्या १२ व्या योजनेच्या मध्यावर आढावा घेत असताना या डिसेंबरपर्यंत आढावा पूर्ण करण्यात येणार आहे. फेब्रुवारी २०१० च्या अर्थसंकल्पात चुकांची दुरूस्ती करण्यात येणार आहे. नियोजन आयोगाच्या राष्ट्रीय हिताला बाधा न आणता महाराष्ट्राला झुकते माप देणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

केंद्रीय नियोजनात वाढतोय मराठी टक्का!

पुणे, ६ सप्टेंबर / खास प्रतिनिधी

मराठी बुद्धिमत्तेचा 'अनुशेष' भरून काढत केंद्रीय नियोजन आयोगाच्या विविध सल्लागार समित्यांवर आता मोठ्या संख्येने महाराष्ट्रातील तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येत असून बाराव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याच्या मोहिमेतही त्यांना सहभागी करून घेतले जाणार आहे.

दिल्लीतील राजकारणामध्ये महाराष्ट्राचा दबावगट प्रभावशाली नाही. त्याचप्रमाणे सनदी अधिकाऱ्यांच्या नोकरशाहीमध्येही बिहार-उत्तर प्रदेशमधील 'आयएएस' अधिकाऱ्यांचा वरचष्मा असतो. देशभरातील नियोजनाची जबाबदारी सांभाळणाऱ्या केंद्रीय आयोगातही मराठी तज्ज्ञांना अभावानेच स्थान देण्यात आले होते. मराठीजनांमध्ये अफाट बुद्धिमत्ता व गुणवत्ता असूनही त्यांना केंद्रीय स्तरावर कायमच डावलले जाण्याच्या अनुभवाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय नियोजन आयोगाच्या नवीन रचनेमध्ये त्यांना मोठ्या संख्येने स्थान मिळाले आहे. आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी ही माहिती दिली.

विकासदर घटल्याने तरतुदींचा फेरआढावा

'अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी नऊ टक्के विकासदर असल्याने त्या अनुषंगाने तरतुदी करण्यात आल्या होत्या. आता विकासदराचा वेग कमी झाल्याने तरतुदींचा फेरआढावा घेण्यात येत आहे. त्यामध्ये प्राधान्यक्रमाने कोणत्या योजना राबवाव्यात, कोणत्या योजनांसाठीचा निधी कमी करावा, या संदर्भातील निर्णय घेण्यात येतील. त्याचप्रमाणे २००७ ते १२ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या योजनेच्या अंमलबजावणीची स्थिती काय आहे, याचीही तपासणी करण्यात येईल. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा दिशादर्शक प्रस्ताव २०११ सालीच तयार होऊन ती योजना वेळेवर सुरू होईल,' असा विश्वास डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केला.

'अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा घेण्याचे काम सध्या सुरू करण्यात आले आहे. नोव्हेंबरपर्यंत त्याचा अहवाल पूर्ण होणार असून राष्ट्रीय विकास परिषदेच्या डिसेंबरमधील बैठकीत तो सादर करण्यात येईल. पंचवार्षिक योजनेद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी सल्लागार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये 'विक्रमी' संख्येने मराठी तज्ज्ञ सहभागी करून देण्यात आले आहेत,' असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले. शिक्षणासंदर्भातील समितीमध्ये न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, भाई वैद्य, कुमार सप्तर्षी, डॉ. गजानन एकबोटे, रमेश जोशी, दिनकर गांगल, हेरंब कुलकर्णी, विजय खोले, अरुण अडसूळ, दिलीप नाचणे, पी. डी. पाटील, सुखदेव थोरात आदींचा समावेश आहे. कामगार कल्याणासंदर्भातील समितीमध्ये एम. के. पंधे, अजिंक्य पाटील, राघव नरसाळे, मुरलीधर चैनी, डॉ. चंद्रहास देशपांडे, जयराज साळगावकर, सुनील कदम, आर. ए. माजगावकर, ए. के. डी. जाधव आदींचा समावेश करण्यात आला आहे. मागासवर्गीय व आदिवासी आणि युवा व क्रीडा या क्षेत्रातील योजनांसाठी स्थापन केलेल्या समितीमध्ये हर्षदीप कांबळे, डॉ. आनंद नाडकर्णी, शरच्चंद्र गोखले, रही नरके, आर. पी. काळे, सुधीर मेश्राम, जी. जी. वानखेडे, पॉल दिवाकर, टी. आर. कानवडे, प्रताप गायकवाड, लक्ष्मण माने, संजय चाकणे, संभाजी पठारे, नयना निमकर, अजित वाडेकर, मिलिंद भोई आदींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. जाधव यांनी दिली. ■

लोकसत्ता
7/9/11

केसरी

नियोजन मंडळाच्या सल्लागार मंडळावर महाराष्ट्रातील तज्ज्ञांची नेमणूक : डॉ. जाधव

पुणे : केंद्रीय नियोजन मंडळाच्या विविध सल्लागार समित्यांवर राज्यातील तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रविवारी दिली.

डॉ. जाधव यांनी काल पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. डॉ. जाधव यांनी सांगितले की, नियोजन मंडळाचा एक सदस्य म्हणून आपण शिक्षण, क्रीडा, अनुसूचित जातीजमाती आणि इतर मागासवर्गीयांचा विकास या विषयांवर प्राधान्याने काम करणार असून, गोवे, बिहार, तामिळनाडू या राज्यांसह दादरा नगरहवेली, दमण-दीव या दोन केंद्रशासित प्रदेशाच्या विकासावर लक्ष केंद्रित करणार आहोत.

प्राथमिक शिक्षण व साक्षरता-विषयक सल्लागार समितीत न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, भाई वैद्य, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. गजानन एकबोटे, रमेश जोशी, दिनकर गांगल, हेरंब कुलकर्णी यांचा समावेश करण्यात आला असून, उच्च व तंत्रशिक्षण समितीत डॉ. विजय खोले, डॉ. अरुण अडसूळ, दिलीप नाचणे, पी. डी. पाटील, डॉ. सुखदेव थोरात यांची नेमणूक केली आहे.

कामगार कल्याणविषयक समितीवर डॉ. एम. के. पंधे, डॉ. अजिंक्य पाटील, राघव नरसाळे, मुरलीधर चैनी, डॉ. चंद्रहास देशपांडे, जयराज साळगावकर, सुनील कदम, आर. एम. माजगावकर यांची नेमणूक केली आहे. अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय विकास समितीवर ए.के. डी. जाधव, अशोक भारती, चंद्रकांत प्रसाद, हर्षदीप कांबळे, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. शरच्चंद्र गोखले, हरी नरके, आर. पी. काळे, सुधीर मेश्राम, जी. जी. वानखेडे यांचा समावेश करण्यात आला आहे. तर अनुसूचित जमाती विकास समितीत प्रा. एन. कानवडे, प्रताप गायकवाड, लक्ष्मण माने यांचा समावेश करण्यात आला असून, क्रीडा विकास समितीत नैना निमकर, अजित वाडेकर, मिलिंद भोई यांचा समावेश केला आहे.

११व्या पंचवार्षिक योजनेचा आढावा डिसेंबरमध्ये घेण्यात येणार असून, त्यातील त्रुटी काढून तंज्ज्ञांच्या चर्चेनंतर १२व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात येईल. सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये मंडळाच्या बैठका होणार असून, हे सर्व अहवाल राष्ट्रीय विकास परिषदेसमोर मांडण्यात येतील. सध्या देशभरात राबविण्यात येणाऱ्या सर्वशिक्षा अभियानाचा प्रसार व्यवस्थित झालेला असला तरी या अभियानाच्या गुणवत्तेबाबत मात्र आपण साशंक आहोत, असेही डॉ. जाधव यांनी नमूद केले.

पावसावर विकासदर अवलंबून

पुणे : ११व्या पंचवार्षिक योजनेत देशाला ९ टक्के विकासदर गाठायचा होता, पण दुर्दैवाने जागतिक मंदी, महागाई, अवर्षण या समस्यांमुळे आपण तो राखू शकलो नाही. ९ टक्के विकासदराचे ध्येय ठरलेले असताना पहिल्या वर्षी जागतिक मंदीमुळे तो ६.७ टक्क्यांवर आला. दुसऱ्या वर्षी अवर्षणामुळे तो आणखी खाली आला. आता सप्टेंबर महिन्यात जर पुरेसा पाऊस पडला तर विकासदर ६.३ टक्के होईल आणि नाही पडला तर ५.५ टक्के होईल. आर्थिक मंदीच्या काळातही सरकारच्या ध्येय-धोरणांमुळे देशाला मंदीची झळ बसलेली नाही, असे प्रतिपादन डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले. राष्ट्रहिताला बाधा न येऊ देता महाराष्ट्राला झुकते माप देणार असल्याचेही जाधव यांनी यावेळी नमूद केले.

चिंतन इमेज मेकर्स

प्रभात
7/9/9

07/01/2009

प्रभात

केंद्रीय सल्लागार समितीत पुण्यातील मान्यवर

११ व्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा

सल्लागार समितीतील सदस्य

डॉ. अरुण अडसुळ, प्रा. डॉ. गजानन एकबोटे, भाई वैद्य, संजय चाकणे, संभाजी पठारे, नैना निमकर, डॉ. मिलिंद भोई, सुनील कदम, हरी नरके, टी. एन. कानवडे, कुमार सप्तर्षी, शरच्चंद्र गोखले

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) : अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा घेण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोगाच्या वतीने विविध विषयांवर अभ्यास करण्यासाठी सल्लागार समितीची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये पुण्यातील अनेक मान्यवर, विचारवंतांचा त्यात समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. नियोजन आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर पुण्यात आलेल्या डॉ. जाधव यांनी केंद्रीय नियोजन आयोगाच्या विविध योजनांची माहिती दिली.

डॉ. जाधव म्हणाले, "अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा घेतला जात आहे. त्यासाठी विविध विषयांसाठी सल्लागार समित्या नेमण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मी महाराष्ट्राला झुकते माप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात पुण्यातील डॉ. अरुण अडसुळ, प्रा. डॉ. गजानन एकबोटे, भाई वैद्य, संजय चाकणे, संभाजी पठारे, नैना निमकर, डॉ. मिलिंद भोई, सुनील कदम, हरी नरके, टी. एन. कानवडे, कुमार सप्तर्षी, शरदच्चंद्र गोखले आदींचा समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या वैचारिक गुणवत्तेचा व अभ्यासाचा केंद्रीय नियोजनासाठी उपयोग करून घेतला जाणार आहे.

अकरावी पंचवार्षिक योजना करताना ९ टक्के विकासदर गृहीत धरून तरतुदी करण्यात आल्या होत्या; परंतु आर्थिक संकटामुळे हा विकासदर आता ६.३ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे त्याचा पुन्हा मध्यावधी आढावा घेतला जात आहे. अनुत्पादित खर्च कमी करणे गरजेचे असल्याने त्यानुसार केंद्रीय नियोजन आयोगाला अहवाल सादर करून आगामी अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये प्रभाव पडण्याची शक्यता आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेचे कामही सुरू झाले आहे. त्यानुसार १ एप्रिल २०१२ ला ती लागू होऊ शकेल. येत्या ३ वर्षांत उच्च शिक्षणाचे चित्र बदलण्याची शक्यता असून त्यात महत्त्वाचे बदल केले जातील. राष्ट्रीय ज्ञान आयोग व यशपाल समितीच्या अहवालांचा त्यात विचार केला जाईल. अभिमत विद्यापीठांचेही नवे नियम करण्याचे काम सुरू आहे. सर्व शिक्षा अभियानाचे काम चांगले सुरू असून सांख्यिक प्रगतीसह गुणवत्तेवर भर दिला जाईल, असेही डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले.

पंचवार्षिक योजनांच्या समित्यांमध्ये मराठी माणसांना झुकते माप

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी)- सध्या आपण अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यावधीवर येऊन पोहचलो असून या पंचवार्षिक योजनेमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे. या योजनांचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या कमिटय़ांमध्ये महाराष्ट्रातील पुणे, मुंबईतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला असून पहिल्यांदाच आयोगाच्या विविध समित्यांवर मराठी लोकांना झुकते माप देण्यात आले आहे. केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी ही माहिती आज पत्रकार परिषदेत दिली.

पुणे विद्यापीठाच्या सेट गेस्ट हाऊस येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत डॉ. जाधव बोलत होते. देशाचे पंतप्रधान हे या आयोगाचे अध्यक्ष असून मॉन्टेक सिंग अहलुवालिया याचे उपाध्यक्ष आहेत; तर आठ सदस्य या आयोगाचे असतात. या आयोगाचा सदस्य म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर सहा महत्त्वांच्या विषयांची जबाबदारी आपल्याकडे देण्यात आली असून यामध्ये शिक्षण, कामगार, सामाजिक न्याय, अनुसूचित जाती-जमाती कल्याणकारी योजना अशा विषयांचा समावेश आहे. २००७ पासून सुरू झालेल्या अकराव्या पंचवार्षिक योजनेचा सप्टेंबर ते नोव्हेंबर या महिन्यांमध्ये मध्यावधी आढावा घेण्यात येत आहे. हा आढावा घेण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील तज्ज्ञांना संधी देण्यात आली आहे. यापूर्वी आयोगाच्या कोणत्याही समितीत घेतले जात नव्हते. तेवढे सदस्य यावेळी महाराष्ट्रातून घेण्यात आले आहे. या समितीकडून या पंचवार्षिक योजनेत सुरू करण्यात आलेल्या विविध योजनांचा आढावा घेऊन तो अहवाल पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकात त्याचा समावेश करण्यात येणार आहे. या समितीने केलेल्या शिफारसीनुसार फेब्रुवारीमध्ये जाहीर होणाऱ्या अर्थसंकल्पात याचा प्रभाव पडणार आहे. जानेवारी महिन्यापासून १२व्या पंचवार्षिक योजनेचे काम सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अकरावी पंचवार्षिक योजना सुरू करताना विकासाचा दर ९ टक्के एवढा ग्राह्य धरला होता; मात्र गेल्या वर्षी आलेल्या जागतिक मंदीमुळे यात घट होऊन हा विकासाचा दर ६.७ टक्क्यांवर आला; तर यंदाच्या वर्षी पाऊस कमी झाल्याने हा दर ६.३ टक्क्यांपर्यंत येण्याची शक्यता आहे. मात्र यामुळे विकासाचा दर खूपच घसरला आहे. हे समजण्याचे कारण नाही. पुढील वर्षी हा विकासाचा दर ८ टक्क्यांपर्यंत तर त्याच्यापुढील वर्षी ९ टक्क्यांवर जाऊ शकतो. त्यामुळे ११व्या पंचवार्षिक योजनेच्या विकासाचा दर सर्वसाधारण ६.८ टक्क्यांवर जाईल. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अनुत्पादित खर्च कमी करून काही नवीन योजना सुरू कराव्या लागतील, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

आयोगाच्या विविध समित्यांवर नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञांची नावे पुढीलप्रमाणे- पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, गजानन एकबोटे, संभाजी पठारे, संजय चाकणे, नैना निमकर, अजित वाडेकर, मिलींद भोई, लक्ष्मण माने, प्राचार्य टी. एन. कानवडे, चंद्रशेखर धर्माधिकारी, भाई वैद्य, एम. के. बंधे, पी. डी. पाटील, कुमार सप्तर्षी.

लोकमत
7/9/09

चित्रा इमेज मॅचर्स

ज्ञान, विद्यापीठ अनुदान आयोग व पंधरा नियंत्रक संस्था मोडीत निघणार

राष्ट्रीय पातळीवर तीन वेगळ्या संस्था स्थापण्याचा विचार- डॉ. जाधव

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी)- उच्च शिक्षणावर नियंत्रण असणाऱ्या राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि विद्यापीठ अनुदान आयोग आणि पंधरा नियंत्रक संस्था मोडीत काढण्याची शक्यता आहे. या संस्थांऐवजी राष्ट्रीय पातळीवर तीन वेगळ्या संस्था स्थापन करण्याबाबत विचार सुरू असल्याचे केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

येत्या दोन ते तीन वर्षांमध्ये उच्च शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल होण्याची शक्यता असून अनुदान आयोगाऐवजी वैद्यकीय शिक्षणासाठी एक, शेतीविषयक शिक्षणासाठी एक; तर उर्वरीत तंत्र आणि इतर शैक्षणिक विभागांवर नियंत्रण ठेवणाऱ्या तीन स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात येणार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा राजीनामा देऊन नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. जाधव आज पहिल्यांदाच पुण्यात आले होते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

विधानसभेसाठी अजिबात इच्छुक नाही

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये तुम्ही शिर्डी मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होता; मात्र तुम्हाला उमेदवारी मिळाली नाही. आता येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत तुम्ही निवडणूक लढविण्यास इच्छुक आहात का? असे आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले की, 'मी विधानसभेसाठी अजिबात इच्छुक नाही.'

नियोजन आयोगाचा सदस्य म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आपल्याकडे शिक्षण, कामगार आणि सामाजिक न्याय, क्रीडा व युवक, अनुसूचित जाती-जमाती कल्याणकारी योजना तसेच आदिवासी कल्याणकारी योजना अशा विषयांची जबाबदारी देण्यात आली असून या विषयांच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

शिक्षणामध्ये प्राथमिक स्तरावरील शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण हे भाग येतात, असे स्पष्ट करून डॉ. जाधव म्हणाले की, आपण सर्व शिक्षा अभियानांतर्गत चांगलीच प्रगती केली आहे. उच्च शिक्षणाबाबत मात्र मोठ्या प्रमाणात बदल होणे गरजेचे आहे. पुढील तीन वर्षांत उच्च शिक्षणाचे चित्र पूर्णपणे बदललेले असेल. यशपाल कमिटी आणि राष्ट्रीय ज्ञान आयोगाने यासाठी सुचविलेल्या सूचनांनुसार उच्च शिक्षणावर नियंत्रण करण्यासाठी एकच राष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात यावी, असे स्पष्ट केले आहे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी देखील उच्च शिक्षणाबाबत केलेल्या भाषणामध्ये वैद्यकीय शिक्षण आणि इतर शिक्षणावर नियंत्रण करण्यासाठी दोन राष्ट्रीय संस्थेची स्थापना करावी. आणि यशपाल कमिटीने आणि ज्ञान आयोगाने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट केल्याने उच्च शिक्षणावर नियंत्रण करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोग तसेच पंधरा इतर संस्था बरखास्त करून केवळ तीन राष्ट्रीय पातळीवरील संस्थांची स्थापना करण्यात येण्याची शक्यता आहे.

प्रभात 7/9/10

प्रभात 07/09/10

मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २००९

लोकनायक

"शब्दात शहाणपण, विचारात निष्ठा, वर्तनात चारित्र्य"

शिखराला भुईची ओढ!

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या रुपाने केंद्रीय नियोजन आयोगाचं सदस्यपद डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्यानंतर दुसऱ्यांदा बौद्ध-आंबेडकरी समाजाला लाभलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' हा सर्वोच्च सन्मान-गौरव जरूर आहे. पण तरीही 'अर्थतज्ज्ञ' म्हणून त्यांची राष्ट्राला ओळख नाही. त्याचं मनातलं सलतं शल्य स्वत: 'अर्थतज्ज्ञ' असलेले आपले पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे नेहमीच बोलून दाखवत असतात. नियोजन आयोगावरील सदस्यांची नियुक्ती करताना त्यांनी दलित समाजातल्या अर्थतज्ज्ञांना विशेष प्राधान्य देण्यामागेती बोचरी सल हमखास असावी. तसंच पंचवार्षिक योजनांच्या आखणी-अंमलबजावणीत थेट तळागाळातल्या उपेक्षित समाजातून आलेल्या तज्ज्ञांचाही सहभाग लाभावा, अशी त्यांची भूमिका दिसते. डॉ. मुणगेकर यांच्यानंतर डॉ. जाधव यांची नियोजन आयोगाच्या सदस्यपदी झालेली नियुक्ती पाहता तोच निष्कर्ष काढावा लागेल. अर्थतज्ज्ञ म्हणून त्या दोघांमध्ये अर्थनीतीवरुन मतभिन्नता जरुर असू शकते. अन् तशी ती असण्यात वावगं काहीच नाही. पण इतर बाबतीत मुणगेकर-जाधव यांच्यात बरंच साम्य आहे. दोघंही माजी कुलगुरु आहेत. पहिले मुंबई विद्यापीठाचे. तर, दुसरे पुणे विद्यापीठाचे. वर्णव्यवस्था आणि जातीयतेमुळे दलित समाजाच्या वाट्याला आलेल्या दारिद्र्याचे चटके त्या दोघांनीही सारखेच सोसलेत. त्याचं दर्शन आपल्याला डॉ. नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप आन् आम्ही' आणि डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या 'मी असा घडलो' या आत्मकथनांमधून घडतं. त्या दोघांचीही समाजाप्रती बांधिलकी आणि उत्तरदायित्वाची भावना, तळमळही टोकाची आहे. मुणगेकर यांना 'युक्रांद'सारख्या सामाजिक संघटनेमुळे चळवळीची, आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. तर, जाधव यांचा पिंड विधायक प्रकृतीचा आहे. त्या ध्यासापोटी त्यांनी दलित विद्यार्थ्यांसाठी निरीच्छ भावनेनं चालवलेल्या स्पर्धात्मक परीक्षांच्या विनामुल्य क्लासेसचे आम्ही साक्षीदार आहोत. त्यामुळे मुणगेकर यांच्यानंतर केंद्रीय नियोजन आयोगावर जाधव यांची नियुक्ती झाल्याची बातमी धडकली, तेव्हाच तिथं ठोस अशा विधायक गोष्टी घडतील याची खूणगाठ आम्ही बांधली होती. ती किती रास्त होती याची त्यांनी नवी दिल्लीत दाखल होताच प्रचिती दिली आहे. नियोजन आयोगाचे सदस्य या नात्याने अकराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षण क्षेत्रातील योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या शिरावर आहे. त्यांच्याकडे बिहार, तामिळनाडू, गोवा या राज्यांसोबतच दीव-दमण आणि दादरा-नगर हवेली या केंद्र शासित प्रदेशातलंही कामकाज सोपवण्यात आलं आहे. पण जाधव यांनी नियोजन आयोगात जाताच त्याच्या विविध सल्लागार मंडळांवर महाराष्ट्रातल्या अधिकाधिक तज्ज्ञांची नेमणूक करुन नवी दिल्लीत एक 'इतिहास' घडवला आहे. मराठी माणसं याआधी सुद्धा नियोजन आयोगात सदस्यपदावर होती. पण आयोगाच्या विविध सल्लागार मंडळांमध्ये मात्र तामिळनाड, बंगाल, दिल्ली चक्क ३५ तज्ज्ञांची वर्णी लावली आहे. नियोजन आयोगात जाधव यांच्याकडे शिक्षण, श्रम, रोजगार, सामाजिक न्याय, क्षमता संवर्धन, क्रीडा, युवक कल्याण ही क्षेत्रं आहेत. त्यांच्या अखत्यारीत सहा सल्लागार मंडळं आहेत. ही सल्लागार मंडळं अकराव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घेवून नियोजन आयोगाला योजनांबाबत महत्त्वपूर्ण शिफारशी करण्याचं काम करणार आहेत. त्यांच्या सूचना-शिफारशींचं प्रतिबिंब २०१० सालच्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातून उमटणार आहे. या महत्त्वाच्या कार्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांनी शालेय शिक्षणाच्या सल्लागार मंडळावर माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, ज्येष्ठ विचारवंत भाई वैद्य, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. गजानन एकबोटे, मुंबईचे रमेश जोशी, दिनकर गांगल, हेरंब कुलकर्णी यांना नेमलं आहे. तर उच्च शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय खोले, पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ, दिलीप नाचणे, पी. डी. पाटील, डॉ. सुखदेव थोरात माजी क्रिकेट कप्तान अजित वाडेकर यांना निवडण्यात आलं आहे. कामगारांच्या योजना राबविण्यासाठी सल्लागार म्हणून सीटूचे अध्यक्ष डॉ. एम. के. पंधे, डॉ. अजित्य पाटील, राघव नरसाळे, मुरलीधर चेनी, डॉ. चंद्रहास देशपांडे, जयराज साळगावकर, सुनील कदम, आर. एम. माझगावकर यांना घेण्यात आलं आहे. एससी, ओबीसी वर्गांच्या कल्याणासाठी ए. के. डी. जाधव, अशोक भारती, चंद्रभान प्रसाद, हर्षदीप कांबळे, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. शरदचंद्र गोखले, हरी नरके, लक्ष्मण माने, आर. पी. काळे, सुधीर मेश्राम, प्रा. जी. जी. वानखेडे यांना निवडलं आहे. केंद्रीय नियोजन आयोगातील सल्लागार मंडळामध्ये महाराष्ट्रातल्या तज्ज्ञांना मुळीच स्थान नसल्याचा भूतकाळ पाहता जाधव यांनी तिथं ऐतिहासिक परिवर्तन घडवलं आहे हे कुणीही मान्यच करेल. पण तरीही आपण खूप मोठं काही केल्याचा त्यांचा आव-अविर्भाव नाही. 'नियोजन आयोगाच्या प्रत्येक सल्लागार मंडळात ३० ते ४० सदस्य असतात. आपण महाराष्ट्रातल्या तज्ज्ञांचा त्यात समावेश करुन फक्त समतोल साधला आहे' असं डॉ. जाधव विनम्रपणे सांगतात. मोठेपण मिळत गेल्यानंतरही विनम्रता कायम राहिली तर मोठेपणात भरच पडत असते. रिझर्व्ह बँक, वर्ल्ड बँक, पुणे विद्यापीठ अशी यशाची शिखरं पादाक्रांत करत ते आता दिल्लीत केंद्रीय नियोजन आयोगात स्थानापन्न झालेत, पण गर्व-अहंकार त्यांच्या आसपासही फिरकलेला नाही. पायाखालच्या महाराष्ट्र भूमीची त्यांची ओढ जराही घटलेली नाही. डॉ. नरेंद्र जाधव यांनी नियोजन आयोगाच्या कामकाजात आपल्या दलित समाजातल्या तज्ज्ञांसह महाराष्ट्रातल्या तज्ज्ञांनाही सहभागाची संधी मिळवून दिली आहे. त्याबद्दल त्यांचं कौतुक-अभिनंदन करावं तितकं थोडंच ठरेल.

उच्च शिक्षण क्षेत्रात महत्त्वाच्या बदलांचे संकेत

पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) : शिक्षणाच्या क्षेत्रात काही महत्त्वाचे बदल घडवण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षण क्षेत्राचा एकूण आढावा घेण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोगाच्या वतीने १४ सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये विशेष बैठक आयोजित केली आहे.

येत्या ३ वर्षांमध्ये उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वाचे बदल होण्याचे संकेत डॉ. नरेंद्र जाधव यांनी यापूर्वीच दिले आहेत. त्याचप्रमाणे मध्यावधी आढाव्यामध्ये सर्व शिक्षा अभियान माध्यमिक स्तरावरही नेण्याचा विचार आहे. या सर्वांचा विचार या नियोजन समितीच्या बैठकीत केला जाईल. तज्ज्ञांचे विचार घेतले जाणार आहेत. अकराव्या पंचवार्षिक योजनेत केलेल्या विविध तरतुदींचा मध्यावधी आढावा घेण्यासाठी नुकतेच केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी विविध सल्लागार समित्यांची स्थापना केली आहे.

लोकमत
9/9/07